चतुर्थश्रेणी संवर्गातून तृतीय श्रेणी
संवर्गात पदोन्नती मिळण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

महसूल व वन विभाग,
परिपत्रक क्रमांक – एसआरव्ही. १०९१/प्र.क्र. १४०/ई-७,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
दिनांक : २३ जून, १९९२.

**परिपत्रक :**

चतुर्थश्रेणीतील पदावरुन तृतीय श्रेणीतील पदावर पदोन्नती निवड मंडळाच्या कक्षेत येते काय याबाबत शासनाकडे विचारणा करण्यात येते. त्या संदर्भात असे स्पष्ट करण्यात येते की, चतुर्थ श्रेणीतील पदावरुन तृतीय श्रेणीतील पदावर देण्यात येणारी पदोन्नती ही निवडमंडळाच्या कक्षेत येत नाही. कारण निवड मंडळे ही सरळसेवा प्रवेशाने नेमणूकी संदर्भातच संबंधीत आहे. त्यामुळे चतुर्थश्रेणी वर्गातील कर्मचाऱ्यांना लिपिक पदावर पदोन्नती देणे हे नियमानुसारच आहे. मात्र अशी पदोन्नती देताना आपण सामान्य प्रशासन विभाग अधिसूचना क्रमांक आरटीआर-१०८२/१/सीआर ७/८५/१२, दिनांक १८ डिसेंबर १९८६ अन्वये लिपिक, लिपिक-टंकलेखक आणि इंग्रजी व मराठी टंकलेखक वर्ग ३ बाबत केलेल्या सेवा भरती नियम १९८६, शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक एसआरव्ही. १०८९/प्र.क्र. २४/३/८९/१२, दिनांक २६ नोव्हेंबर १९९० अन्वये लिपिक, टंकलेखक, लिपिक-टंकलेखक अशी स्वतंत्र पदे अस्तित्वात रहाणार नाहीत व यापुढे लिपिक-टंकलेखक अशीच पदे अस्तित्वात रहातील व त्यानुसार पदे भरण्यात यावीत असे आदेशीत केले आहे.

आणि शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक आरटीआर-११७१/२०३२/१२, दिनांक २३ सप्टेंबर १९७५ अन्वये सेवेत नियुक्त करण्यापूर्वी एस.एस.सी. उत्तीर्ण झालेल्या चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांनासुध्दा पदोन्नतीसाठी पात्र ठरविण्यात यावे असा निर्णय घेण्यात आला आहे. त्या प्रकरणीही लिपिक असा स्वतंत्र संवर्ग आता अस्तित्वात नाही. सबब त्यावेळी बाबतीत ते टंकलेखनाची विहीत परीक्षा उत्तीर्ण असले पाहिजेत. पदोन्नतीने भरावयाची पदे शासनाने विहित केलेल्या प्रमाणापेक्षा जास्त होणार नाही याबाबत दक्षता घ्यावी.

ह्या सर्व आदेशाचे पालन करुन चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांना लिपिक पदावर पदोन्नती देण्यात यावी. उक्त आदेशांच्या प्रती सुलभ संदर्भासाठी सोबत जोडल्या आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

[ ड. मु. वाघराळकर ]

कार्यासन अधिकारी

महसूल व वन विभाग.

सहपत्र : वरीलप्रमाणे.

प्रति :

सर्व विभागीय आयुक्त,

सर्व जिल्हाधिकारी,

सामान्य प्रशासन विभाग/कार्यासन १२,

वित्त विभाग,

निवड नस्ती, ई-७ कार्यासन, महसूल व वन विभाग.